# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः24.07.2025** **वारःगुरुवार**

---

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ब्रिटन दौऱ्यात भारत ब्रिटन मुक्त व्यापार करारावर होणार शिक्कामोर्तब
- केंद्रीय गृहमंत्री राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ ची घोषणा करणार
- ४३ वा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना जाहीर
- संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये कालही कामकाज दिवसभरासाठी तहकूब
- आणि
- दिव्या देशमुख FIDE महिला विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल

**पंतप्रधान**

भारत आणि इंग्लंड धोरणात्मक संबंधांना नवी गती देण्यावर आज व्यापक चर्चा करण्याची अपेक्षा आहे. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी ब्रिटनचे पंतप्रधान

केयर स्टारमर यांच्यासोबत द्विपक्षीय संबंधांवर व्यापक देवाण-घेवाण करतील. संरक्षण, व्यापार आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात द्विपक्षीय संबंध वाढवण्यासाठी पंतप्रधान मोदी काल रात्री दोन दिवसांच्या दौऱ्यावर ब्रिटनमध्ये पोहोचले. भारत-

ब्रिटन मुक्त व्यापार कराराची औपचारिकता ही मोदी यांच्या दौऱ्याचा एक प्रमुख निष्कर्ष ठरणार आहे. वाणिज्य मंत्री पियुष गोयल आणि त्यांचे ब्रिटिश समकक्ष जोनाथन रेनॉल्ड्स दोन्ही पंतप्रधानांच्या उपस्थितीत FTA वर स्वाक्षरी

करतील. तीन वर्षांच्या वाटाघाटींनंतर निश्चित झालेल्या या व्यापार करारामुळे सर्व क्षेत्रांमध्ये भारतीय वस्तूंसाठी व्यापक बाजारपेठ उपलब्ध होईल अशी अपेक्षा आहे.

पंतप्रधानांनी समाज माध्यमावरील संदेशात लंडनमधील भारतीय समुदायानं केलेल्या स्वागताबद्दल आभार व्यक्त केले आहेत. भारताच्या प्रगतीबद्दल या समुदायाला वाटणारी आत्मीयता आणि प्रेम बघून त्यांनी आनंद व्यक्त करत जागतिक प्रगतीसाठी भारत-ब्रिटन यांच्यातील दृढ मैत्रीची आवश्यकता पंतप्रधानांनी या संदेशात अधोरेखित केली आहे.

**सहकारधोरण**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा आज नवी दिल्लीतील अटल अक्षय ऊर्जा भवन येथे राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ ची घोषणा करणार आहेत. हे धोरण हा एक प्रमुख सुधारणा उपक्रम असून पुढील दोन दशकांसाठी भारताच्या सहकारी चळवळीला ते मार्गदर्शक ठरेल अशी अपेक्षा आहे. भारताचं पहिलं राष्ट्रीय सहकार धोरण २००२ मध्ये सादर करण्यात आलं होतं.

माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली ४८ सदस्यीय समितीने नवीन धोरण तयार केले आहे. या धोरणाचं उद्दिष्ट सहकारी संस्थांना अधिक समावेशक, व्यावसायिकरित्या प्रस्थापित करणे आणि भविष्यातील संधींसाठी तयार हे करणे आहे. या धोरणामुळे सहकारी परिसंस्थेत संरचनात्मक बदल घडून येतील आणि नवोपक्रम, पारदर्शकता आणि शाश्वतता वाढेल अशी अपेक्षा आहे.

**गगनयान**

देशातील पहिल्या मानवी अंतराळयान कार्यक्रमाच्या, गगनयानच्या मानवी-रेटेड प्रक्षेपण वाहनाचा विकास आणि जमिनीवरील चाचणी पूर्ण झाली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी काल लोकसभेत एका लेखी उत्तरात ही माहिती दिली. २०३५ पर्यंत भारतीय अंतरिक्ष स्थानकाची स्थापना करणे आणि २०४० पर्यंत पहिला भारतीय चंद्रावर पाठवणे अशी देशाची दीर्घकालीन महत्त्वाकांक्षा असल्याचं डॉक्टर सिंह यांनी सांगितलं.

**संसद-गदारोळ**

संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज काल सलग तिसऱ्या दिवशी विरोधकांच्या गोंधळामुळं विस्कळीत झालं. बिहारमधील मतदार याद्यांचं विशेष पुनरिक्षण आणि इतर मुद्द्यांवर चर्चा करण्याची मागणी करत काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्ष आणि इतर विरोधी पक्षांनी घोषणा दिल्या. सभापतींनी सदस्यांना सभागृहाचं कामकाज सुरू ठेवण्याची विनंती केली. गेल्या दोन दिवसांत आधीच मौल्यवान वेळ वाया गेला आहे असं सभापतींनी नमूद केलं.

गोंधळाच्या वातावरणात, युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक, २०२५ आणि राष्ट्रीय उत्तेजक द्रव्यविरोधी (सुधारणा) विधेयक, २०२५ सादर केले.

राज्यसभेतही असंच दृश्य पाहायला मिळाले. दुसऱ्यांदा कामकाज स्थगित झाल्यानंतर, दुपारी २ वाजता विरोधी पक्षांनी सभागृहात गोंधळ घातला आणि बिहारमधील मतदार याद्या सुधारणांवर चर्चा करण्याची मागणी केली. गोंधळाच्या वातावरणात, बंदर, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी समुद्रातून वस्तू वाहतूक विधेयक, २०२५ विचारार्थ आणि मंजूरीसाठी मांडलं, परंतु गोंधळामुळ त्यावर चर्चा होऊ शकली नाही.

**भारत-इस्राएल बैठक**

भारत आणि इस्रायल यांनी दीर्घकालीन दृष्टिकोनातून द्विपक्षीय संरक्षण सहकार्य आणखी भक्कम करण्यास सहमती दर्शविली आहे. संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांनी काल नवी दिल्ली इथं

इस्रायलच्या संरक्षण मंत्रालयाचे महासंचालक मेजर जनरल अमीर बाराम यांच्याशी द्विपक्षीय बैठक घेतली. संरक्षण मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे की संरक्षण संबंध अधिक दृढ करण्यासाठी संस्थात्मक चौकट विकसित करण्यावर बैठकीत सहमती झाली. मेजर जनरल अमीर बाराम यांनी पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला आणि दहशतवादाविरुद्धच्या भारताच्या लढाईला पूर्ण पाठिंबा दर्शविला. संरक्षण सचिवांनी दहशतवादाबद्दल भारताच्या शून्य सहनशीलतेच्या दृष्टिकोनाचा पुनरुच्चार केला आणि ७ ऑक्टोबर २०२३ रोजी इस्रायलमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यांचा निषेध केला आणि सर्व ओलिसांची सुटका करण्याचं आवाहन केलं. गेल्या वर्षी जुलैमध्ये भारतात झालेल्या शेवटच्या संयुक्त कार्यगटाच्या बैठकीपासून सुरू असलेल्या संरक्षण सहकार्य उपक्रमांच्या प्रगतीचाही दोन्ही बाजूंनी आढावा घेतला.

**भारत-चीनसीमाबैठक**

भारत-चीन सीमा व्यवहारांसंबधी सल्लामसलत आणि समन्वयासाठी कार्य यंत्रणेच्या ३४ व्या बैठकीत आज दोन्ही देशांनी सीमावर्ती भागातील परिस्थितीचा आढावा घेतला. भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व संयुक्त सचिव - पूर्व आशिया - गौरंगलाल दास यांनी केलं तर चिनी शिष्टमंडळाचं नेतृत्व चीनच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या सीमा आणि महासागरीय व्यवहार विभागाचे महासंचालक हॉंग लियांग यांनी केलं. हॉंग लियांग यांनी परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांचीही भेट घेतली.

सीमावर्ती भागातील असलेल्या शांततेमुळे द्विपक्षीय संबंध हळूहळू सामान्य होत आहेत. राजनैतिक आणि लष्करी पातळीवर सीमावर्ती भागाशी संबंधित मुद्द्यांवर नियमित देवाणघेवाण आणि संपर्क ठेवण्यास त्यांनी सहमती दर्शविली.

**टिळक-पुरस्कार**

लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीनं देण्यात येणारा त्रेचाळिसावा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार, केंद्रीय रस्ते आणि भुपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना जाहीर झाला आहे. शुक्रवारी १ ऑगस्टला हा पुरस्कार गडकरी यांना पुण्यात प्रदान करण्यात येईल. ‘लोकमान्यांच्या चतुःसूत्रीतील स्वदेशीचा स्वीकार करत गडकरी यांनी रस्त्यांच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीत मोठे कार्य सुरू केले आहे. विविध प्रकारच्या वाहन निर्मितीत स्वदेशीचा पुरस्कार आणि प्रसार त्यांच्याकडून होत आहे. देशाच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान लक्षात घेऊन त्यांची ४३ व्या लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असल्याची माहिती टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉक्टर रोहित टिळक यांनी दिली.

एलएस मिडिया

भारतात दीड लाखांहून अधिक प्रकाशनं आणि ९०८ खासगी दूरचित्रवाणी असल्याची माहिती, काल लोकसभेत माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन यांनी दिली. प्रेस रजिस्ट्रार जनरल यांच्याकडे नोंदणीकृत प्रकाशनांची संख्या २०१४-१५ मध्ये १ लाख होती ती, २०२४-२५ मध्ये दीड लाखांवर गेली आहे. खासगी उपग्रह दूरचित्रवाणी वाहिन्यांची संख्या देखील वाढून २०२४-२५ मध्ये ९०८ झाली आहे. आजपर्यंत, डीडी फ्री डिशवर ९२ खासगी वाहिन्या आणि ५० दूरदर्शन वाहिन्या उपलब्ध आहेत. प्रसार भारतीच्या जाळ्याचा देशभरात विस्तार ही एक निरंतर प्रक्रिया असल्याचंही मंत्र्यांनी सांगितलं.

**इथेनॉल मिश्रण**

भारतानं पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाचं २० टक्के लक्ष्य गाठल असल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. स्वच्छ ऊर्जेच्या वापरामुळं १ लाख ३६ हजार कोटी रुपयांची परकीय चलन बचत झाली आहे. यामुळं शेतकऱ्यांना १ लाख १८ हजार कोटी रुपये मिळाले आहेत आणि ६९८ लाख टन कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन कमी झालं आहे अशी माहिती त्यांनी दिली.

**क्रिकेट–कसोटी**

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतील चौथा सामन्याच्या पहिल्या दिवशी भारतानं ४ बाद २६४ अशी आश्वासक सुरुवात केली आहे . साई सुदर्शननं ६१ तर यशस्वी जयस्वालनं ५८ धावा केल्या. रवींद्र जडेजा आणि शार्दुल ठाकूर आज खेळ पुढे सुरु करतील.

**बुद्धिबळ**

जॉर्जियातील बटुमी इथं झालेल्या फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक २०२५ च्या उपांत्य फेरीच्या दुसऱ्या सामन्यात काल चीनच्या टॅन झोंगी हिला हरवून भारताच्या दिव्या देशमुखनं अंतिम फेरीत स्थान मिळवलं. या विजयासह, दिव्यानं २०२६ मध्ये होणाऱ्या कँडिडेट्स स्पर्धेतही स्थान मिळवलं आहे आणि तिचा पहिला ग्रँड मास्टर निकषही पार केला आहे. १९ वर्षीय दिव्या फिडे महिला विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश करणारी पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे.

**तानसा**

मुंबईला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या सात जलाशयांपैकी तानसा तलाव ओसंडून वाहू लागला आहे. मोडक सागर तलाव ९ जुलै रोजीच भरला होता. सातही जलाशयांमधील एकंदर पाणीसाठा सुमारे ८७ टक्क्यांपर्यंत वाढला आहे.

**हवामान**

कर्नाटकच्या किनारी भागात, कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी आज मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. दिल्ली, चंदीगड, हरियाणा, जम्मू आणि काश्मीर, बिहार, गुजरात आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये येत्या २-३ दिवसांत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.